झालेअसल्यास फळछाटणी घेता येईल. याच तुलनेत सरळ काडी असलेल्या बागेत ८ ते ९ डोळ्यांच्या पेऱ्यांमध्ये छाटून बघावे.

### हायड्रोजन सायनामाइडचा वापर :-

बागेत एकसारखे व लवकर डोळे फुटण्याकरिता हायड्रोजन सायनामाइडचा वापर महत्त्वाचा असतो. बागेत जरी द्राक्षवेल व्यवस्थापन काटेकारेपणे केले असेल तरी या वेळी काड्यांची जाडी मात्र एकसारखी दिसत नाही. ५-१० टक्के काड्या जास्त जाडीच्या दिसून येतील. अशा काड्यांना तितक्यात मात्रेचे पुन्हा एकदा पेस्टींग करून ती जाड काडी पिळून घ्यावी. असे केल्यास प्रत्येक जाडीच्य काड्या एकाच वेळी फुटण्यास मदत होईल.

काडीची जाडी, काडीवरील पानगळ किती दिवसांत झाली, बागेतील तापमान किती आहे यावर हायड्रोजन सायनामाइड्चे प्रमाण अवलंबून असते. उदा.ऑक्टोबर महिन्यात जर तापमान ३५ अंश सेल्सिअस पर्यंत असून, पानगळसुद्धा चांगली झाली, काडीची जाडी ८ ते १० मि.मी. असल्यास ३० मि.लि. हायड्रोजन सायनामाईड प्रतिलीटर पाणी याप्रमाणे पुरेसे होईल. याच तुलनेत तापमान कमी आणि काडी जास्त जाडी असलेल्या परिस्थितीत हायड्रोजन सायनामाईडची मात्रा वाढवावी लागेल.

### पोंगा अवस्था महत्त्वाची :-



बागेत फळछाटणी झाल्यानंतर साधारणत: ८ ते ९ दिवसांत डोळे कापसायला सुरुवात होते. यालाच पोंगा अवस्थासुद्धा म्हणतात. ही अवस्था घड चांगले निघण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असते. या वेळी जर बागेत पाऊस जास्त प्रमाणात येऊन बोद व मुळांच्या भोवती पाणी जास्त झाले असल्यास वेलींमध्ये जिबरेलीन्सचे प्रमाण वाढण्याची जास्त शक्यता असेल. अशा परिस्थितीमध्ये दोन वेलींमध्ये छोटी चारी घेऊन बोदातील पाणी बागेबाहेर काढावे. याचसोबत, डोळा कापसलेल्या परिस्थितीत बागेत शिफारशीनुसार पोटॅश व सायटोकायनीनयुक्त (६ बी.ए.) प्रमाण वाढेल व घड जिरण्याच्या समस्येवर उपाय करता येईल.

### फुटींची विरळणी महत्त्वाची :-

द्राक्षबागेत पोंगा अवस्था संपल्यानंतर १० ते ११ व्या दिवशी घड बाहेर पडताना दिसतात. आपण काडीवर ३ ते ४ डोळ्यांवर हायड्रोजन सायनामाईडचे पेस्टिंग केले, तेव्हा आता पूर्ण डोळे फुटलेले असतात. पाच पानांच्या अवस्थेत दिसत असलेला द्राक्षघड मजबूत असल्यास १४ ते १६ दिवसांच्या कालावधीमध्ये बागेत निघालेल्या आवश्यकतेपेक्षा जास्त फुटी व घडांची संख्या कमी करावी. बागेमध्ये फुटी जर जास्त काळ तशाच राहिल्या आणि त्यावेळी जर बागेत पाऊस झाल्यास तयार झालेल्या कॅनॉपीमध्ये आर्द्रता वाढेल व छाटणी केलेल्या काडीवर डाउनी मिल्ड्यू रोगाचा प्रार्दुभाव होईल.



या वेळी जर जास्त पावसात प्रिब्लुम अवस्थेतील द्राक्षघडावर पाणी पडल्यास कूज होण्याची शक्यता जास्त असते. तेव्हा, अशा परिस्थितीमध्ये १४ ते १६ दिवसांच्या कालावधीत फेलफूट काढणे गरजेची असते.

### घडांची विरळणी :-

द्राक्षबागेत जर चांगल्या प्रकारे व्यवस्थापन झाले असल्यास घडनिर्मिती ही प्रत्येक काडींवर दिसून येईल तेव्हा आवश्यकतेप्रमाणे किंवा आपल्या उद्देशाप्रमाणे द्राक्षघडांची संख्या राखून इतर घड कमी करावेत.



*****


लेखक

प्रा.वि. भि. भिसे
विषय विशेषज्ञ (उद्यान विद्या)

डॉ. ला. रा. तांबडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख

कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर


तांत्रिक माहिती स्त्रोत :- राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र,पुणे.


प्रकाशन वर्ष : ऑक्टो.२०१८ | एकूण घडी पुस्तिका क्र.६२ | एकूण प्रकाशन क्र.७१ | प्रति : २००० | एकूण खर्च : रू.७६९२/- कृ.वि.के.सोलापूर


# द्राक्ष पिकामध्ये ऑक्टोबर छाटणीसाठी करावयाचे नियोजन










संपादक व प्रकाशक

डॉ. लालासाहेब रा. तांबडे
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

शबरी कृषि प्रतिष्ठान संचलित,

कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर

सोलापूर-बार्शी रोड, मु.खेड, पो.केगाव,
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर (महाराष्ट्र)
संपर्क : ९५५२६३३३२२
Email : kvksolapur@rediffmail.com
Visit us at : www.kvksolapur.org




## द्राक्ष पिकामध्ये ऑक्टोबर छाटणीसाठी करावयाचे नियोजन

सोलापूर जिल्ह्यातील द्राक्ष पिकाची ऑक्टोबर छाटणी म्हणजेच फळाची छाटणीला विशेष महत्व आहे. ऑक्टोबर छाटणीलाच फळांची छाटणी किंवा गोडी छाटणी असेही म्हटले जाते. ऑक्टोबर छाटणीचे खालील सहा अवस्थामध्ये नियोजन करणे अत्यंत महत्वाचे असते.



१) छाटणीपूर्व करावयाची कामे :–
२) छाटणी व कोंबाची (पोंग्याची) वाढ :–
३) फुलोऱ्यांची अवस्था :–
४) मणी धरणे व मण्याच्या वाढीची अवस्था :–
५) फळाच्या पक्वतेची अवस्था :–
६) फळ छाटणीची अवस्था :–

### छाटणी पूर्व करावयाची कामे :–
### बागेत पानगळ महत्वाची :–

फळछाटणीपूर्वी बागेत पानगळ करणे महत्वाचे असते. पानगळ केल्यामुळे डोळे उघडे पडतात आणि फुगलेले दिसतात. ऑक्टोबर छाटणी पूर्वी हलक्या जमीनीसाठी कमीत कमी ७ दिवस तर भारी जमीनीसाठी १५ दिवस अगोदर बाग ताणावर सोडावी म्हणजेच ७–१५ दिवस बागेला पाण्याचा ताण द्यावा. पानगळ कशी करावी व कधी करवी हे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी वेलीची नैसर्गिक रित्या पानगळ होणे शक्य नसल्यास इथ्रेलची मात्रा कधी व किती प्रमाणात वापरावी हेही माहित असणे खूप गरजेचे आहे. पानगळ करण्यासाठी पाच ते सात दिवस अगोदर बागेचे पाणी देणे बंद करावे. छाटणीच्या तारखेपूर्वी १५ दिवस अगोदर वेलीची अवस्था पाहून इथ्रेलची फवारणी करावी. यासाठी इथेफॉन २.५ ते ३.५ मि.ली. प्रती लिटर प्रमाणे फवारणीसाठी वापरावे. या सोबतच ०:५२:३४ या खतांची ५ ग्रॅम प्रति लिटर प्रमाणे मिसळून फवारणी करावी. प्रति एकर फवारणीसाठी बागेतील पानाची अवस्था निरोगी व सशक्त असल्यास ४५० ते ५०० लिटर पाणी फवारणीसाठी वापरावे व पाण्याचा पी.एच. ४ ते ४.५ दरम्यान ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचा परिणाम हा ३ ते ४ दिवसानंतर पाने हळुहळु पिवळी पडून गळायला लागतात. त्यामुळे जवळपास ८ ते १० दिवसांमध्ये ९७ टक्क्यापर्यंत पानगळ होण्यास मदत होते.

### अन्नद्रव्य व्यवस्थापन :–

द्राक्ष बागेत फळछाटणीनंतर अन्नद्रव्याची पूर्तता महत्वाची असते. या वेळी बागेमध्ये अन्नद्रव्य पुरवठा करण्याकरिता वेलीचे बोद खोदून अन्नद्रव्य पुरवठा करणे गरजेचे असते. या वेळी बोद खोदल्यानंतर वेलीची मुळी काही प्रमाणात तुटण्याची संभावना असते. परंतु १० टक्क्यापेक्षा जास्त मुळी तुटणार नाही याची काळजी घ्यावी. बोदामध्ये अन्नद्रव्य पुरवठा करण्यापूर्वी बागेतील माती परीक्षण केल्यास त्याचा चांगला फायदा होतो.

रा.द्रा.सं.केंद्र, पूणे व म. फु.कृ. वि.राहूरी यांनी प्रति हेक्टरी द्राक्ष पिकासाठी ६६६ कि.नत्र, ८८८ कि.स्फुरद व ६६६ कि पालाश या खतांची शिफारस केली आहे. यापैकी खरड छाटणीनंतर ७०% नत्र (४६६ कि), ५०% स्फुरद (४४४ कि) व ३०% पालाश (२०० कि) देणे गरजेचे आहे. या खताचा मुख्यत्वे करून वापर हा द्राक्षवेलीच्या काड्याची वाढ चांगली होण्यासाठी व भरपूर अन्नसाठा तयार करून चांगल्या प्रतिची घड निर्मिती होण्यासाठी केला जातो.

| अन्नद्रव्यांची शिफारस / कालावधी | शेणखत / कंपोस्ट | नत्र | स्फुरद | पालाश |
|---|---|---|---|---|
| एकूण वार्षिक मात्रा | १० टन | ६६६ कि./हे. | ८८८ कि./हे. | ६६६ कि./हे. |
| एप्रिल छाटणीनंतर | ६ टन | ४६६ (७०%) | ४४४ (५०%) | २०० (३०%) |
| ऑक्टोबर छाटणीनंतर | ४ टन | २०० (३०%) | ४४४ (५०%) | ४६६ (७०%) |
| वापराची अवस्था | दोन्ही छाटणी नंतर लगेच | छाटणीनंतर ७० ते १०० दिवसादरम्यान | छाटणीनंतर लगेच शेणखत किंवा कंपोष्टसोबत | पाणी उतरेपर्यंत ३२६ कि.व पाणी उतरण्याच्या अवस्थेत १४० कि. |

यासोबतच दुय्यम खतांची मात्रा जसे की कॅल्शियम, मॅग्नेशियम, सल्फर व सूक्ष्म अन्नद्रव्य युक्त खते वेळोवेळी फवारणीद्वारे किंवा ठिबकद्वारे द्राक्ष पिकास द्यावी.

### काडीची तपासणी :–

फळछाटणीपूर्वी काडीची तपासणी केल्यास काडीवर नेमक्या कोणत्या डोळ्यामध्ये चांगल्या प्रकारचा द्राक्षघड आहे याची खात्री होईल. यामुळे द्राक्षबागेत फळछाटणीच्या त्रुटी राहणार नाही. तेव्हा बागेत प्रत्येक जाडीचा (६–८, ८–१०, १०–१२ मिमी काडीची जाडी) जवळपास ५ ते ६ काड्या गोळा कराव्यात. त्या ओल्या गोणपाटामध्ये गुंडाळून प्रयोगशाळेमध्ये पाठवाव्यात. सूक्ष्मदर्शकाखाली काडीच्या डोळ्याची तपासणी करणतेवेळी डोळा ताजा असावा. तेव्हा ही काडी सुकणार नाही याची काळजी घ्यावी. बऱ्याच वेळा बागेमध्ये काडी बाहेरून तपकिरी रंगाची दिसून येते. परंतु, काडीचा काप घेतल्यानंतर ती काडी आतमधून पांढरी असते. अशा काडीमध्ये पिथ चांगल्याप्रकारे तयार झाला नाही. अशा काडीवर छाटणी घेतल्यास गोळी घडाकडे त्यातील डोळाचे रूपांतर होत असताना दिसते. कारण, या काडीमध्ये अन्नद्रव्याचा पुरवठा फारच कमी असतो. या



बाहेरून परिपक्व व आतून कच्ची असलेली काडी



बाहेरून आणि आतून परिपक्व काडी

परिस्थितीमधील बागेत फळछाटणी थोडी उशिरा घ्यावी. याचसोबत शेडापिचिंग करणे, बगलफुटी काढणे तसेच पोटॅशियम फवारणी तसेच जमिनीतून उपलब्धता करणे या गोष्टी महत्वाच्या असतील. काडी परिपक्व झाल्यावर फळछाटणी घेता येते हे पडताळून पाहण्याकरिता बागेमध्ये सबकेन केलेल्या काडीवर सबकेनच्या एक डोळा मागे कात्रीने काप घ्यावा. या ठिकाणी जर पिथ चांगल्या प्रकारे तयार